**<u>ठळक बातम्या</u>**

- शेतकऱ्यांच्या हिताशी केंद्र सरकार तडजोड करणार नसल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- ऊसतोड कामगार महिलांसाठीच्या साथिया मोहिमेला सुरुवात

- नोंदणीकृत आस्थापनांची संख्या वाढवण्यासाठी ESIC कडून विशेष योजनेची घोषणा

**आणि**

- गडचिरोली जिल्ह्यातल्या काटली गावाजवळ रस्ता अपघातात चार विद्यार्थ्यांचा मृत्यू

**<><><><>**

केंद्र सरकार शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी तसंच शेतीवरचा खर्च कमी करण्यासाठी सातत्यानं काम करत असून शेतकऱ्यांच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत आज हरित क्रांतीचे प्रणेते डॉक्टर एम. एस. स्वामीनाथन यांच्या जन्म शताब्दीनिमित्त आयोजित आंतरराष्ट्रीय संमेलनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. डॉ. स्वामिनाथन यांनी भारताला अन्नाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्यासाठीच्या चळवळीचं नेतृत्व केलं, असंही मोदी यावेळी म्हणाले.

**- होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री - -**

**<><><><>**

ओबीसी समाजाने देशाच्या जडणघडणीत दिलेलं योगदान पाहता, आपल्या सरकारला तसंच देशाला या समाजाच्या पाठीशी उभं राहण्याची आवश्यकता असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज गोव्यात राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या दहाव्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते.

**<><><><>**

मुंबई - गोवा महामार्गाचं काम पुढ्या एका वर्षात शंभर टक्के पूर्ण होणार असल्याची ग्वाही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली आहे. ते मुंबई - गोवा

महामार्गाच्या पाहणीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. पळस्पे ते महाड दरम्यान त्यांनी ही पाहणी केली. गणपतीच्या काळात भाविकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी या महामार्गावरचे खड्डे भरण्याच्या सूचना त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या.

**<><><><>**

सामाजिक न्याय विभाग आणि बीड जिल्हा परिषदेच्या संयुक्त प्रयत्नातून ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाचं उद्घाटन आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झालं. मिशन साथिया असं या योजनेचं नाव असून त्याद्वारे ऊसतोड कामगारांच्या टोळी मधील्या एका महिलेला आरोग्य सेवेचं प्रशिक्षण आणि आरोग्य किट देण्यात येणार आहेत.  अशा एक हजार किटचं वितरणही आज करण्यात आलं.

**<><><><>**

राज्यातल्या ३५ निवडक विषयांची तड लावण्यासाठी महसूल विभागाने अभियान सुरू केल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते आज धाराशिव इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. शेतरस्ते, पाणंद रस्ते बारा फुटांचे करणे, पवन ऊर्जा निर्मितीसाठी राज्यस्तरीय धोरण करणं,  शासकीय जमिनीवरचे २०११ पूर्वीचं अतिक्रमण नियमित करणं, वर्ग दोन मधून वर्ग एकच्या जमिनी नियमित करणं, आदी विषयांचा यात समावेश आहे. आगामी काळात महसूल विभागाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणार असल्याचंही बावनकुळे यांनी सांगितलं.

**<><><><>**

मुंबईत गेट वे ऑफ इंडिया आणि नरिमन पॉईंट या ठिकाणी पर्यटन सुरक्षा दलाचा प्रारंभ केला जाणार आहे. पर्यटन विभागाकडून पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटन सुरक्षा दल हा नाविन्यपूर्ण उपक्रम महाबळेश्वर, पाचगणी या ठिकाणी राबवला जात आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सुरक्षा दलाच्या कामगिरीचा आढावा घेतल्यानंतर ही घोषणा केली. मुंबईत या दलामध्ये काम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य माजी सैनिक कल्याण मंडळातले अधिकारी-कर्मचारी घेतले जातील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यातल्या अधिकाधिक आस्थापनांनी SPREE अर्थात Scheme for Promotion of Registration of Employers and Employees या योजनेचा लाभ घेऊन ESIC अर्थात कर्मचारी राज्य विमा महामंडळाकडे कामगारांची नोंदणी करावी असं आवाहन विमा आयुक्त रामजी लाल मीना यांनी केलं आहे. मुंबईत आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. या योजनेंतर्गत १० पेक्षा अधिक लोक काम करत असलेल्या विविध आस्थापनांना ESIC वेबसाईटवर नोंदणी करता येईल. नोंदणीपूर्वीच्या कालावधीसाठी त्यांच्याकडून कुठलाही दंड किंवा शुल्क आकारले जाणार नाही, जुने हफ्ते भरावे लागणार नाहीत, जुने ऑडिट होणार नाही किंवा नोंदणी पूर्व कालावधीसाठी कुठल्याही कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार नाही.

याशिवाय ऑक्टोबरपासून एक amnesty स्कीम सुद्धा सुरू होणार आहे. या अंतर्गत ESIC आणि नोंदणीकृत संस्था यांच्यातील न्यायालयात गेलेले वाद तडजोडीनं सोडवले जाणार आहेत. ३१ मार्च २०२५ पूर्वी दाखल झालेले वाद यासाठी पात्र असतील अशी माहिती पश्चिम विभागाच्या संचालक अभिलाषा झा यांनी दिली.

**<><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या काटली गावाजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात चार विद्यार्थी एका ट्रकच्या धडकेत मृत्यूमुखी पडले. तर अन्य दोघे जखमी झाले. त्यानंतर संतप्त नागरिकांनी हा महामार्ग रोखून धरला. या अपघातात जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी हवाईमार्गे नागपूरला नेण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींच्या उपचाराचा खर्चही राज्यशासन करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्ताने केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी आज नवी दिल्लीत संत कबीर हातमाग पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार प्रदान केले. सोलापूरच्या राजेंद्र सुदर्शन अंकम यांना संत कबीर हातमाग पुरस्कार मिळाला आहे. साडेतीन लाख रुपये रोख, सुवर्णमुद्रा, ताम्रपट, शाल आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं

स्वरुप आहे. सुती वॉल हँगिंग, गालिचे यांच्यावर चित्र विणण्याच्या एकमेवाद्वितीय कौशल्यासाठी अंकम यांना हा पुरस्कार मिळाला आहे. निसर्गचित्र आणि व्यक्तिचित्र अशा दोन प्रकारांमध्ये अंकम विणकाम करतात. हा पुरस्कार मिळाल्यानंतर राजेंद्र अंकम यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**- - होल्ड बाईट - राजेंद्र अंकम - -**

हातमाग क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे देशभरातले उत्कृष्ट विणकर, विक्रेते, संकल्पनाकार तसंच स्टार्टअप्स आणि उत्पादकांच्या कामाची दखल घेणं हा या पुरस्काराचा उद्देश आहे.

**<><><>**

उत्तराखंडमधे उत्तरकाशी इथं ढगफुटी आणि मुसळधार पावसामुळे दरडी कोसळून झालेल्या दुर्घटनेत बचावकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. आज सकाळी वातावरण निरभ्र असल्यानं बचावकार्याला वेग आला आहे. गंगोत्री आणि हर्षिल परिसरात वेगवेगळ्या राज्यातले पर्यटक अडकले आहेत. त्यातल्या २७४ जणाची सुटका अतापर्यंत करण्यात आली असून त्यात महाराष्ट्रातले १५१ पर्यटक आहेत. त्यापैकी १२० पर्यटकांशी संपर्क झाला असून ते आयटीबीपी कॅम्पमध्ये सुरक्षित आहेत. उर्वरित ३१ पर्यटकांशी संपर्क साधण्यासाठी मुख्य सचिव राजेश कुमार यांनी उत्तराखंडचे मुख्य सचिव आनंद बर्धन यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून पर्यटकांना शोधण्यासाठी आणि महाराष्ट्रात आणण्यासाठी आवश्यक ती मदत करण्याची विनंती केली.

**<><><>**

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारनं ३६८ कोटी रुपयांहून अधिक मदत द्यायला मान्यता दिली आहे. यंदाच्या जून महिन्यात छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभाग आणि गेल्यावर्षीच्या सप्टेंबर - ऑक्टोबर मध्ये धाराशिव, छत्रपती संभाजीनगर आणि धुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी ही मदत दिली जाणार असल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

**<><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परभणी जिल्ह्यातले तीन वेळचे आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी आज काँग्रेसमधे प्रवेश केला. मुंबईत टिळक भवन इथं हा पक्षप्रवेश सोहळा झाला. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या सर्वांचं पक्षात स्वागत केलं. माजी मंत्री अमित देशमुखही यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

गेल्या चोवीस तासात मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. तर कोकण आणि गोव्यात अनेक ठिकाणी पाऊस पडल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. पुढच्या दोन दिवसात कोकणात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**//<><><><>//**